सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १७१ | शनिवार, दि. १४ मार्च २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन





**श्री. बाबूलाल पाटील**
पत्रकार



**श्री. नितीन कोल्हे**
मॉर्डन कॉम्प्यूटर, अमळनेर



**श्री. धीरेंद्र पाटील**
(मुन्ना भाऊ) नाशिक



**श्री. संदीप मुंदाणकर**
शाश्वती अकॅडमी, अमळनेर



**श्री. भूषण पाटील**
म्हाडा, नाशिक
















अमळनेर : १) श्री मंगळग्रह देवतेचे पूजन करताना जिल्हाधिकारी रोहन घुगे. २) जिल्हाधिकारी रोहन घुगे यांना श्री मंगळग्रह देवतेची प्रतिमा देवून सत्कार करताना मंगळ ग्रह सेवा संस्थेचे सचिव सुरेश बाविस्कर. शेजारी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल, संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले, उपाध्यक्ष एस. एन. पाटील, सहसचिव दिलीप बहिरम, प्रशासन अधिकारी आर. जी. चव्हाण. ३) श्री मंगळग्रह देवतेचे पूजन करताना मीनल करणवाल. ४) भूमी सुपोषण चळवळ राष्ट्रीय शुभारंभ कार्यक्रमाची माहिती देताना मंगळ ग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले. शेजारी बैठकीस मार्गदर्शनासाठी उपस्थित असलेले जिल्हाधिकारी रोहन घुगे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल, प्रांताधिकारी मयूर भंगाळे, तहसीलदार रुपेशकुमार सुराणा, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, आशिष चौधरी आदी. ५) भूमी सुपोषण चळवळ राष्ट्रीय शुभारंभ कार्यक्रमाच्या नियोजनाबाबत मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी रोहन घुगे. शेजारी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल, प्रांताधिकारी मयूर भंगाळे, तहसीलदार रुपेशकुमार सुराणा, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, मंगळ ग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले व पदाधिकारी. ६) श्री मंगळग्रह मंदिरात रोपवाटिकेची पाहणी करताना जिल्हाधिकारी रोहन घुगे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल, प्रांताधिकारी मयूर भंगाळे, डॉ. डिगंबर महाले, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम आदी. ७) भूमी सुपोषण चळवळ कार्यक्रमाच्या स्थळाच्या पाहणीप्रसंगी जिल्हाधिकारी रोहन घुगे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल, प्रांताधिकारी मयूर भंगाळे, तहसीलदार रुपेशकुमार सुराणा, संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम आदी.

(छायाचित्रे : मयूर चौधरी)

# भूमी सुपोषण चळवळीच्या राष्ट्रीय शुभारंभी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी झाली प्रशासकीय बैठक

## जिल्हाधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती : सर्व यंत्रणांची युद्धपातळीवर तयारी सुरू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील श्री मंगळग्रह मंदिर येथे गुरुवार, दि. १९ मार्चला केंद्रीय कृषीमंत्री ना. शिवराजसिंहजी चौहान यांच्या प्रमुख उपस्थितीत अक्षय कृषी परिवार व मंगळ ग्रह सेवा संस्था अमळनेर यांच्या संयुक्त विद्यमाने भूमी सुपोषण चळवळीचा राष्ट्रीय शुभारंभ होत आहे. या पार्श्वभूमीवर शुक्रवार, दि. १३ मार्च रोजी जिल्हाधिकारी श्री. रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री मंगळग्रह मंदिर येथे सुमारे दोन तासांची प्रशासकीय मेगा बैठक झाली.

यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल, प्रांताधिकारी मयूर भंगाळे, पोलीस उपअधीक्षक विनायक कोते, जिल्हा कृषी अधीक्षक के. एन. तडवी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सुभाष राऊत, तहसीलदार रुपेशकुमार सुराणा, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, बीडीओ एन. आर. पाटील, मुख्याधिकारी गणेश शिंदे, उपविभागीय कृषी अधिकारी सी. डी. साठे, कृषी विभागाचे उपसंचालक भरत इंगळे, महावितरणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता टी. एच. नेमाडे व उपकार्यकारी अभियंता नितीन चौधरी, वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रकाश ताडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गिरीश गोसावी, निवासी नायब तहसीलदार सी. यू. पाटील, नायब तहसीलदार ए. पी. कुलकर्णी तसेच शासकीय यंत्रणेतील जवळपास सर्वच विभागांचे जबाबदार अधिकारी व कर्मचारीही उपस्थित होते. मंदिराच्या अभिषेक गृहात व्हिडिओ कॉन्फरन्सिंगसह बैठकीचे नियोजन करण्यात आले होते. आशिष चौधरी यांनी पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनसह अन्य डिजिटल जबाबदाऱ्या सांभाळल्या.

जिल्हाधिकारी श्री. घुगे यांनी जिल्ह्यातील सर्व कृषी अधिकाऱ्यांशी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे चर्चा केली. त्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या. सर्व कृषी अधिकाऱ्यांनी भूमी सुपोषणाच्या प्रचार प्रसारासाठी त्यांनी केलेले व करीत असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. यावेळी श्री. घुगे यांनी सांगितले, की देशातील कृषी क्षेत्रासाठी अत्यंत उपयुक्त असलेली ही चळवळ खरे तर लोकचळवळ आहे. मात्र, या चळवळीला शासकीय पाठबळ मिळाल्यास ती अधिक प्रभावी व व्यापक होईल. त्यासाठी प्रशासनातील सर्वच विभागांनी आपापल्या परीने प्रयत्न करायचे आहेत. अमळनेरकडे येणारे व बाहेर पडणारे सर्व रस्ते परीक्षण करून रस्त्याबाबतच्या समस्यांचे तत्काळ निराकरण करण्याचे आदेशही श्री. घुगे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले. सती माता मंदिराजवळील बोगदा व रस्ता या समस्येबाबतही त्यांनी युद्धपातळीवर मार्ग काढण्यास सांगितले. सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून अग्निशामक दल, ॲम्बुलन्स, पुरेसे पोलीस दल आदींबाबतही श्री. घुगे यांनी सूचना दिल्या. सर्वच विभागाचे अधिकारी त्यांच्या जबाबदाऱ्या पूर्तीसाठी करीत असलेले व करणार असलेले प्रयत्न आदींची माहिती जाणून घेतली. सर्व अधिकाऱ्यांनी अत्यंत समाधानकारक प्रतिसाद दिला.

श्रीमती करणवाल यांनी सांगितले, की कृषी क्षेत्रातील सर्वच घटकांपर्यंत जावून या उपक्रमाची माहिती व उपयुक्तता पटवून दिली पाहिजे. त्यांनी काही महत्वाच्या सूचनाही दिल्या.

मंगळ ग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांनी कार्यक्रमाचे व उपक्रमाचे एकूणच सर्व स्वरूप सांगितले. १९ मार्चचा कार्यक्रम देशातील सर्व कृषी विद्यापीठ व कृषी महाविद्यालये तसेच देशातील प्रमुख ६०० जिल्ह्यांमध्ये थेट प्रक्षेपित केला जाणार आहे. त्यासाठीची सर्व तांत्रिक तयारी जवळपास पूर्ण झाली आहे, अशी माहितीही डॉ. महाले यांनी दिली.

बैठकीनंतर जिल्हाधिकाऱ्यांसह उपस्थित सर्व अधिकाऱ्यांनी कार्यक्रम स्थळ, पार्किंग, व्हीआयपी पार्किंग, आगमन व बाहेर पडण्याचे मार्ग, स्वच्छतागृहे, रस्ते आदी सुविधांची प्रत्यक्ष स्पॉटवर जावून माहिती घेतली. दरम्यान, बैठकीनंतर अप्पर पोलीस अधीक्षक सौ. कविता पवार- नेरकर यांनीही मंदिर व कार्यक्रम स्थळाला भेट दिली. सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून अत्यावश्यक सूचना दिल्या.

### अमळनेरचीच निवड का?

अमळनेर येथील श्री मंगळग्रह मंदिर येथे विश्वातील दाक्षिणात्य शैलीतील भूमी मातेची एकमेव मूर्ती आहे. तसेच विश्वातील एकमेव भूमीपुत्र अर्थात श्री मंगळग्रहाची स्वयंभू मूर्ती आहे. त्यामुळेच अमळनेर या मंगल नगरीचे स्थानमहात्म्य विचारात घेऊन अमळनेरची निवड करण्यात आली आहे.

### दर्शन आणि स्वागत- सत्कार

जिल्हाधिकारी पदाचा पदभार घेतल्यानंतर श्री. घुगे यांनी प्रथमच श्री मंगळग्रह मंदिराला भेट दिली. डॉ. महाले यांनी त्यांना मंदिराचा सर्व इतिहास व महत्व सांगितले. मंदिरात श्री. घुगे व श्रीमती करणवाल यांनीही विधिवत छोटेखानी पूजाही केली. मंदिरातर्फे उपाध्यक्ष एस. एन. पाटील, सचिव एस. बी. बाविस्कर, सहसचिव दिलीप बहिरम, मुख्य कार्यकारी अधिकारी ॲड. आर. जी. चव्हाण, मंगल सेवेकरी प्रकाश मेखा यांनी श्री. घुगे व श्रीमती करणवाल यांचा यथोचित सत्कार केला.

### १९ मार्चचे वैशिष्ट्ये

गुरुवार, दि. १९ मार्च रोजी वर्षप्रतिपदा आहे. वर्षप्रतिपदा हा भूमी मातेचा जन्मदिवस आहे. त्याच दिवशी हिंदू नववर्षारंभ व साडेतीन मुहुर्तांपैकी एक शुभमुहूर्त असलेला अर्थात गुढीपाडवा आहे. त्यामुळेच १९ मार्च रोजी भूमी सुपोषण चळवळीचा राष्ट्रीय शुभारंभ करण्याचे सुनिश्चित झाले आहे.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

## संपादकीय

# महागाईचा सांगावा

इराण–इस्त्रायल आणि अमेरिकेतील युद्धाची परिस्थिती दिवसेंदिवस चिघळत आहे. खामेनी यांच्यासह प्रमुख नेत्यांची हत्या झाल्यानंतर इराण चुटकीसरशी शरण येईल, हा अमेरिकेचा भ्रम फोल ठरला. इराण–इस्त्रायल आणि अमेरिका यांच्यातील युद्ध पश्चिम आशियाच्या प्रदेशात लढले जात असले, तरी त्याचा फटका साऱ्या जगाला बसणार हे स्पष्ट होते. इराणने होर्मुझची सामुद्रधुनी बंद केल्याने ही झळ आता इतरत्र पोहोचत आहे. सागरी मार्गाने होणाऱ्या एकूण तेलवाहतुकीपैकी २० टक्के वाहतूक जिथून होते, ती सामुद्रधुनी बंद झाल्याने जगाला आता तेलाच्या संकटाला सामोरे जावे लागेल. सर्वोच्च नेते अयातुल्लाह अली खामेनी यांच्या हत्येनंतर सूडभावनेने पेटलेला इराण अशा प्रकारची कारवाई करू शकतो, ही भीती अखेर खरी ठरली. इराणच्या या कृतीमुळे भारताच्या तेलाच्या आयातीपैकी सुमारे ५० टक्के तेलाचा पुरवठा आटण्याची भीती आहे. पूर्वी महायुद्धाच्या काळात जीवनावश्यक वस्तूंची टंचाई, साठेबाजी आणि महागाई यांच्या कहाण्या जुन्या पिढीकडून अनेकांनी ऐकल्या असतील; त्यांची आठवण या निमित्ताने आल्यावाचून राहत नाही. भारताकडे दीड महिना पुरेल, एवढा तेलाचा साठा असल्याने सध्या तरी याबाबत देश 'सुस्थितीत' असल्याचे सरकारने म्हटले आहे; मात्र युद्ध अधिक काळ लांबल्यास हे संकट गहिरे होऊ शकते. त्यातच ट्रम्प यांनी, हे युद्ध दीर्घ काळ चालेल, असे भाकीत वर्तविल्याने त्याचे परिणाम सर्वांनाच भोगावे लागणार, असे दिसते.

उलटपक्षी इराणकडून इस्त्रायलसह आखाती देशांवर क्षेपणास्त्रांचा भडिमार सुरू आहे. या हल्ल्यांच्या जोडीने होर्मुझची सामुद्रधुनीही इराणने बंद केली. येथून वाहतूक केल्यास जहाजांना आग लावण्याचाही इशाराही इराणी लष्कराकडून देण्यात आल्याने वाहतूकदारांचे धाबे दणाणले आहे. जगाच्या आर्थिक नाड्या आवळण्यासाठीच इराणने हे दबावतंत्र अवलंबले, हे उघड आहे. ओमानच्या आखातामधून अरबी समुद्राला जोडणाऱ्या मार्गावरील होर्मुझच्या सामुद्रधुनीचा हा चिंचोळा पट्टा जागतिक व्यापाराच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील आहे. तो वाहतुकीसाठी बंद झाल्याने तेल पुरवठादार आणि आयातदार अशा दोन्ही बाजूंची अडचण होईल. सौदी अरेबिया, इराक, कुवेत, बहारीन, संयुक्त अरब अमिराती (यूएई) आणि खुद्द इराण या प्रमुख उत्पादकांकडून तेलनिर्यात रोखल्यास या देशांची कोंडी होणार आहे; त्यामुळेच कतारने द्रवरूप नैसर्गिक वायूचे उत्पादनही तूर्तास थांबवले आहे. त्याशिवाय या तेलावर अवलंबून असलेल्या भारत, चीन, जपान या देशांपुढे ऊर्जासंकट उभे राहिले आहे. १९८० नंतर हा मार्ग अव्याहत सुरू आहे. काही काळापूर्वी इराणच्या युद्धसरावाच्या निमित्ताने हा मार्ग अंशतः बंद राहिल्याने झालेल्या सहा टक्के दरवाढीमुळे या संकटाची चुणूक दिसून आली होती. होर्मुझच्या मार्गाला तेलवाहिनीसारखे पर्याय पुरेसे नाहीत आणि व्यवहार्यसुद्धा नाहीत.

चीननेही हा मार्ग सुरू ठेवण्याचे आवाहन इराणला केले; तसेच ट्रम्प यांनीही तेलवाहतुकीच्या जहाजांना सुरक्षा पुरवण्याचे आश्वासन दिले असले, तरी येथील व्यापार मंदावणार, यात शंका नाही. भारताच्या इंधनाच्या गरजेपैकी ८५ टक्के तेल आयात केले जाते. त्यापैकी ५० टक्के पुरवठा होर्मुझच्या मार्गाने होतो. युद्ध लांबले आणि हा ओघ आटला, तर कच्च्या तेलाचे प्रतिबॅरलचे दर शंभर डॉलरपर्यंत वाढण्याची भीती आहे. त्यामुळे देशात पेट्रोल–डिझेलच्या दरांत वाढ होण्याची शक्यता आहे. इंधनखर्च वाढल्यास वाहतुकीचा खर्च वाढून ही परिस्थिती जीवनावश्यक वस्तूंसह एकूण महागाईला निमित्त ठरते. त्यात साठेबाजी आणि कृत्रिम दरवाढीचीही भर पडण्याची भीती आहे. त्यामुळे परकीय चलनातून होणारा आयातखर्च वाढणार आणि विकासदरावरसुद्धा परिणाम होण्यासारखी संकटे क्रमाने संभवतात. गेल्या काही काळात भारताने रशिया किंवा अमेरिकेसारखे पर्याय अवलंबून तेलखरेदीमध्ये वैविध्य साधण्याचे प्रयत्न केले असले, तरी अद्याप हे उद्दिष्ट दूर आहे आणि युद्धाने होणाऱ्या परिणामांपासून पूर्णतः दूर राहणे जागतिकीकरणाच्या काळात शक्य नाही. पुरवठा साखळी विस्कळित झाल्याने खतांच्या पुरवठ्यावरही परिणाम होण्याची भीती आहे. दुसरीकडे आखाती देशांमध्ये जाणारी फळे, भाजीपाला; विशेषतः युद्ध लांबल्यास आंब्याची निर्यातही अडचणीत येऊन शेतकऱ्यांना मोठा फटका बसू शकतो. रशिया–युक्रेन आणि गाझापट्टीतील युद्धापाठोपाठ सुरू झालेल्या या तिसऱ्या युद्धामध्ये हार–जीत कोणाचीही झाली, तरी जागतिक अर्थव्यवस्थेतील याचे अनर्थ स्पष्ट दिसत आहेत. मात्र, अगदी आत्तापर्यंत अनेक युद्धे थांबवल्याचे दावे करून शांततेचे 'नोबेल' मिळवण्याचे मार्ग खुंटल्यावर आता संपूर्ण जगाला युद्धाच्या खाईत लोटणाऱ्या ट्रम्प यांना रोखणार कोण, हा प्रश्न आहे.





# रणाईचे, भरवस तीर्थक्षेत्रासाठी २ कोटी ९० लाखांचा निधी

## आमदार अनिलदादा पाटील यांच्या प्रयत्नांना यश

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



अमळनेर : तालुक्यातील रणाईचे व भरवस येथील महानुभाव पंथाच्या तीर्थक्षेत्रासाठी शासनाच्या वतीने २ कोटी ९० लाखांचा निधी मंजूर झाला आहे. या निधीतून मंदिर परिसरात सभामंडप, डोम, सुशोभीकरण व पर्यटन संदर्भात विविध विकासकामे मार्गी लागणार आहेत, अशी माहिती आमदार अनिलदादा पाटील यांनी प्रसिद्धी पत्रान्वये दिली.

आमदार अनिलदादा पाटील यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रात म्हटले आहे, की महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक विभागाचे आदेश बुधवार, दि. ११ मार्च रोजी प्राप्त झाले आहे. यात रणाईचे व भरवस येथील देवस्थानांचा समावेश आहे. यात रणाईचे येथील महानुभाव पंथाचे श्रीकृष्ण मंदिर परिसरात सभामंडप बांधकाम करणे १ कोटी रुपये, रणाईचे येथीलच महानुभाव पंथाचे श्रीकृष्ण मंदिर परिसरात सुशोभीकरण करणे १ कोटी आणि रणाईचे येथील महानुभाव पंथाचे श्रीकृष्ण मंदिर परिसरात सभामंडप व डोम बांधकाम करणे ५० लाख, तसेच भरवस येथील श्री चक्रधर स्वामी मंदिर परिसरात पर्यटन विषयक विविध विकासकामे करणे ४० लाख अशा २ कोटी ९० लाखांच्या विकासकामांचा समावेश आहे.

अमळनेर तालुका तथा मतदारसंघात रणाईचे व भरवस हे महानुभाव पंथाचे तीर्थक्षेत्र असून याठिकाणी संपूर्ण महाराष्ट्रातुन महानुभाव पंथाचे अनुयायी येत असतात. आमदार अनिलदादा पाटील हे मोठ्या श्रद्धेने या परिवाराशी जुळलेले आहेत. या ठिकाणी भाविकांच्या सोयीसाठी व मंदीर सुशोभीकरणसाठी निधी आवश्यक असल्याने रणाईचे येथील प. पू. प. म. वर्धनस्थ बिडकर बाबा महानुभाव व भरवस येथील प. पू. ढोकिकर बाबा यांनी विकासकामांसाठी निधीची मागणी केली होती. अखिल भारतीय महानुभाव परिषदेचे अध्यक्ष कवीश्वर कुळाचार्य श्री कारंजेकर बाबा, प्रकाशशेठ नन्नावरे यांनी संपूर्ण महाराष्ट्रातील महानुभव पंथाच्या तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी निधीची मागणी केली होती. अखेर राज्यशासनाने या तीर्थक्षेत्रास निधी मंजूर करून भाविकांची मोठी सोय केली आहे. त्यामुळे रणाईचे व भरवस येथील दोन्ही तिर्थक्षेत्रांचा कायापालट होणार असल्याचे आमदार अनिलदादा पाटील यांनी सांगितले. निधीच्या मंजुरीबद्दल आमदार अनिलदादा पाटील व खासदार स्मितताई वाघ यांनी मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना. एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्राताई पवार, जलसंपदामंत्री मंत्री ना. गिरीश महाजन, पर्यटनमंत्री ना. शंभूराजे देसाई, पर्यटन राज्य मंत्री ना. इंद्रनील नाईक व पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांचा ऋणनिर्देश केला आहे.

# 'आरके फूड्स'वर दंडात्मक कारवाई

## बाजार समिती, वांधा समितीने दिला शेतकऱ्यांना न्याय

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : तालुक्यातील मंगरूळ येथील आर. के. फूड्स कंपनीच्या गहू खरेदीत शेतकऱ्यांच्या मालाच्या वजनात सुमारे ३६ टक्के तफावत आढळून आली. याबाबत बाजार समितीचे सभापती अशोक पाटील व वांधा समितीने दोन तक्रारदार शेतकऱ्यांना वाढीव ३६ टक्के मालाचा मोबदला मिळवून दिला. तसेच आर. के. फूड्सचे तीन वर्षांचे दप्तर ताब्यात घेऊन कंपनीविरुद्ध पोलिसांत तक्रार देण्याचा निर्णय घेतला आहे. तर तांत्रिक दोष आढळून आल्याने वजनमाप निरीक्षकांनी देखील वजन काटा बंद करून दंडात्मक कारवाई केली आहे.

मंगरूळ येथे आर. के. फूड्स कंपनीत शेतकऱ्यांचा गहू विकत घेऊन त्यापासून आटा, पीठ, रवा, मैदा, सुजी आदी पदार्थ बनवले जातात. मात्र १० रोजी दोन शेतकऱ्यांना आपल्या मालाच्या वजनात तफावत आढळल्याने त्यांनी बाजार समिती सभापती अशोक पाटील यांच्याकडे तक्रार केली होती. सभापती अशोक पाटील व बाजार समितीचे सचिव डॉ. उन्मेष राठोड यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन तपासले असता त्यांना देखील वजनात प्रचंड तफावत आढळून आली. त्यांनी तातडीने कंपनीसह वजन काट्याला सील लावले होते. त्यांनतर हे प्रकरण बाजार समितीच्या वांधा कमिटीपुढे ठेवून कंपनीचे मालक, शेतकरी यांना समक्ष बोलावले. दुसरीकडे वजनमाप निरीक्षक कुमारसिंग राजपूत याना तक्रार करण्यात आली. वजनमाप निरीक्षक राजपूत यांनी कर्मचाऱ्यांसमक्ष सील उघडून काटा तपासला असता एक सेलची वायर तुटलेली आढळली. प्रत्यक्ष वजन करून पाहिले असता वजनात तफावत आढळून आली. त्यामुळे पंचनामा करून काटा बंद करण्यात आला. कंपनीला कारणे दाखवा नोटिसा देऊन त्यांच्याविरुद्ध वजन माप कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करून दंडात्मक कारवाई केली. तसेच वांधा कमिटीचे अध्यक्ष सुरेश पिरन पाटील, सभापती अशोक पाटील, संचालक प्रा. सुभाष पाटील, डॉ. अनिल शिंदे, भोजमल पाटील, समाधान धनगर, हिरालाल पाटील, शरद पाटील, प्रकाश वाणी, वृषभ पारख सचिव डॉ. उन्मेष राठोड यांच्यासमोर चर्चा करून साधारणतः वजनात ३६ टक्के तफावत आढळून आली. दोन तक्रारदार शेतकऱ्यांना जागेवरच व्यापारी योगेश वाणी यांच्याकडून मालाचा मोबदला देण्यात आला.

### कंपनीचे दप्तर जमा करून पोलिसात देणार तक्रार!

मापात पाप झाल्याच्या तक्रारी यापूर्वीही अनेक शेतकऱ्यांनी केल्या आहेत. सभापती अशोक पाटील यांनी त्यांचेही म्हणणे ऐकून घेतले. शेतकरी, कर्मचारी, कंपनी यांनी संयुक्तरित्या सीसीटीव्ही फुटेज तपासले जातील. मालाबाबत सरासरी अंदाज लावून मालात किती तफावत आढळून येते तसा मोबदला कंपनीने अथवा खरेदीदार व्यापारी योगेश वाणी यांनी द्यावा असा, निर्णय यावेळी घेण्यात आला. तसेच कंपनीचे तीन वर्षांचे दप्तर जमा करून ते तपासून पोलिसात तक्रार देण्याचेही सभापती पाटील यांनी सांगितले.

# चिमणीच्या आकाराचा द्वी– द्वी करणारा वटवट्या




ग्लोबल महातेज वृत्तसेवा

**नाव :** वटवट्या Warbler

**रंग :** राखाडी, फिकट तपकिरी

**आकार :** चिमणीच्या आकारा प्रमाणे, पाच इंच

**चोच :** लहान, बुटकी, तिक्ष्ण, मजबूत, चोचीचा रंग काळा

**डोळे :** लहान, लालसर असतात. डोळ्याच्या वर पांढरी रेघ आढळते.

**अंडी :** लहान, टणक व तपकिरी रंगाची असतात. मादी तीन ते पाच अंडी घालते.

**खाद्य :** गवतातील किटक, सुरवंट

**घरटे :** वटवट्या झाडांच्या फांद्यांमध्ये घर बांधतो. ते पानांमध्ये लपलेले असते.

**वैशिष्ट्ये :** हा पक्षी भारतभर आढळतो. सतत द्वी द्वी आवाज करतो म्हणून याला वटवट्या नाव पडले. मानवी वस्ती जवळ राहतो. अत्यंत चपळ आहे.

**संग्राहक : प्रा. प्रकाश धर्माधिकारी**
**निसर्ग मित्र मंडळ, अमळनेर.**

# गांजा सेवनप्रकरणी चौघांवर 'एनडीपीएस'चा गुन्हा दाखल

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : गांजाला प्रतिबंध घातला असला तरीही अनेक तरुण गांजा सेवनाच्या आहारी गेले आहेत. याबाबत मोठ्या प्रमाणात तक्रारी असल्याने स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे राहुल गायकवाड व येथील पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांनी संयुक्त कारवाई केली आहे. चार वेगवेगळ्या ठिकाणी गांजा सेवन करणाऱ्या तरुणांना पकडून त्यांच्यावर 'एनडीपीएस' कायद्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सद्यस्थितीत तरुण गांजा सेवनाकडे वळले आहेत. भविष्यात ते गुन्हेगारीकडे वळतील ही शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे वेळीच आवर घालणे गरजेचे आहे, या दृष्टीने 'एलसीबी' व येथील पोलीस ठाण्याने ही संयुक्त मोहीम राबविली. एलसीबी निरीक्षक राहुल गायकवाड यांनी त्यांचे कर्मचारी प्रवीण मांडोळे , संदीप पाटील, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांनी पोलीस उपनिरीक्षक शरद काकळीज, हेड कॉन्स्टेबल मिलिंद सोनार, विनोद संदानशिव, नितीन मनोरे, उदय बोरसे, नीलेश मोरे, उज्वल कुमार म्हस्के, नितीन कापडणे यांना ११ रोजी वेगवेगळ्या ठिकाणी छापे घालण्यासाठी रवाना केले.

मारवड रस्त्यावर उड्डाणपुलाच्या खाली राजेश चुडामन कोईकर (वय २१ रा. बंगाली फाईल), इंदिरा भवनच्या मागे मोकळ्या जागेत आदिल आबीद शेख (वय २५ रा. माळीवाडा, बहादरपूर रोड), नईमअली अशपाक अली (वय २५ रा. गांधलीपुरा), रेल्वे स्थानकाच्या बाहेर पाण्याच्या टाकीजवळ नीलेश महेंद्र पाटील (वय २२ रा. बंगाली फाईल) हे चारही जण गांजा सेवन करताना आढळले. चौघांकडून चिलीम आणि गांजा जप्त करण्यात आला. त्यांच्यावर एनडीपीएस कायदा ८ क, २७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेतकी संघ जीन, बस स्थानकाच्या मागे, अंबरीष टेकडी, चोपडा रोड उड्डाण पूल, दाजीबा नगर जवळील मैदान आदी विविध ठिकाणी देखील काही तरुण गांजा सेवन करीत असल्याची ओरड आहे. तेथेही छापे घालून कारवाई करण्याची मागणी होत आहे.

## जाहीर सुचना

तमाम नागरीकांना या जाहीर सूचनेव्दारे कळविण्यात येते की, श्री. संदिप अशोक पाटील रा. अमळनेर यांना जुने बस स्टण्ड राजीव गांधी मार्केट मधील दुकान नं. २ चे जागेत बि-बियाणे किटक नाशके व्यवसायासाठी या खाजगी जागेत व्यवसाय सुरु करावयाचा आहे. सदरच्या व्यवसयाबाबत कुणाची हरकत असल्यास त्यांनी जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसाचे आत नगरपरिषद कार्यालयात कार्यालयीन वेळेत लेखी हरकत द्यावी. मुदतीत कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास अर्जदारास व्यवसाय ना-हरकत प्रमाण पत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. कळावे.

सही/-
मुख्याधिकारी
अमळनेर नगरपरिषद

# चुलीवर गुळाचा चहा करून गॅस दरवाढीचा निषेध

## काँग्रेसतर्फे आंदोलन; विविध मागण्यांचे प्रांताधिकाऱ्यांना निवेदन

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील घरगुती व व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या दरवाढीच्या काँग्रेसतर्फे निषेध करण्यात आलाआहे. शुक्रवार, दि. १३ मार्च रोजी तहसील कार्यालयाच्या आवारात चुलीवर गुळाचा चहा करून गॅस दरवाढीचा निषेध करण्यात आला. या अनोख्या आंदोलनाने अमळनेरकरांचे लक्ष वेधेल होते. काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी तीन विटांची चूल मांडली. त्यावर गुळाचा चहा तयार करून केंद्र सरकारच्या धोरणाचा निषेध व्यक्त केला. यावेळी गॅस सिलेंडरच्या वाढीव किमती त्वरित कमी कराव्यात व जनतेला पूर्ववत दरात सिलेंडर उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी करण्यात आली. याबाबत प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांना निवेदनही देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे, की युद्धजन्य परिस्थितीचा फायदा घेत केंद्रातील भाजप सरकारने गॅस दरवाढ केली आहे. राज्यात आधीच महागाई वाढलेली असताना घरगुती व कमर्शियल गॅस सिलेंडरच्या किमती अचानक वाढविण्यात आल्या आहेत. आतापर्यंत मोदी सरकारच्या कार्यकाळात सुमारे ५० वेळा गॅस सिलिंडरच्या किमती वाढवण्यात आल्याचा आरोप करण्यात आला. घरगुती गॅस सिलिंडर ७२० रुपयांवरून ८६० रुपये करण्यात आले आहे. प्रति सिलिंडर सुमारे ६० रुपयांची वाढ झाली आहे. कमर्शियल गॅस सिलेंडरची किंमत १ हजार ८१० रुपयांवरून १ हजार ९२४ रुपये करण्यात आले आहे. प्रति सिलेंडर ११४ रुपयांची वाढ झाली आहे. तसेच घरगुती गॅस सिलिंडरचा नोंदणी कालावधी ग्रामीण भागात ४५ दिवस आणि शहरी भागात २५ दिवस करण्यात आले आहे. काँग्रेसच्या कार्यकाळात गॅस सिलिंडर सुमारे ४०० रुपयांना मिळत होता, तर सध्या त्याची किंमत जवळपास ९०० रुपयांपर्यंत पोहोचल्याचे सांगत, हेच का भाजप सरकारचे अच्छे दिन? गॅस दरवाढीमुळे सर्वसामान्य नागरिक, महिला तसेच हॉटेल व्यवसायिकांना मोठा आर्थिक फटका बसणार आहे.

या आंदोलनात काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भागवत सूर्यवंशी, लोटन अण्णा चौधरी, सुलोचना वाघ, मगन वामन पाटील, मनोज पाटील, संदीप घोरपडे, गजेंद्र साळुंखे, ॲड. तीलोत्तमा पाटील, कैलास प्रल्हाद पाटील, ॲड. क्रांती ठाकरे, ॲड. चारू शिंदे, के. व्ही. पाटील, डी. झेड. महाजन, पार्थराज पाटील, बन्सीलाल भागवत, ए. डी. पाटील, भगवान संदानशिव, तौसिफ तेली, डॉ. रवींद्र पाटील, अनिल पाटील, नगराज पाटील, रामकृष्ण नामदेव पाटील, एस. सी. तेले, रोहिदास कापडे, दिलीप पाटील, राजेंद्र चौधरी, डॉ. प्रकाश सोनवणे, पी. वाय. पाटील, राजू भाट, पितांबर पाटील, भिकाजी पाटील, मनोहर पाटील, मधुकर पाटील आदी उपस्थित होते.



अमळनेर : चुलीवर गुळाचा चहा करून गॅस दरवाढीचा निषेधप्रसंगी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भागवत सूर्यवंशी, संदीप घोरपडे आदी.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com



# बहुगुणी तेजपानाचे आरोग्यदायी महत्त्व अन् फायदे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपल्या स्वयंपाकातील बहुगुणी तसेच मसाल्याच्या प्रकारांत तेजपानाचे आरोग्यदायी महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्याचे अनेक फायदेही आहेत. जाणून घेऊया...

**१) प्रसूती :** गर्भवती स्त्रीला जर याचा धूप सुंघण्यासाठी दिला तर तिची प्रसूती लवकर व वेदनामुक्त होते.

**२) तोतरेपणा :** तेजपान जिभेखाली ठेवल्यास तोतरेपणा, जीभेचे जडत्व निघून जाते.

**३) दात रोग :** तेजपानाच्या चूर्णाने दात घासल्यास दात मजबूत होतात. जर दातात कीड असेल तर ती मरून बाहेर पडते.

४) शरीरातून कुठूनही रक्त येत असेल, तर जसे- नाकाचा घोळणा फुटणे, कानातून रक्त येणे, मूळव्याधरक्ती, युरिनमधून रक्त येणे, तोंडातून रक्त येणे
अशा सर्वच त्रासांत जर एक ग्लास पाण्यात एक चमचा तेजपानाचे चूर्ण मिसळून दोनदा प्याल्यास आराम पडतो.

**५) सर्दी :** नाकातून सतत पाणी येणे, शिंका येणे, डोके भारी वाटणे यावर तेजपान आधी तव्यावर शेकून मग चूर्ण बनवा. प्रत्येक वेळेस ६ ग्रॅम चूर्ण घेऊन १८० ग्रॅम पाण्यात उकळून अर्धे झाले की थोडी साखर व थोडे दूध मिक्स करून प्यावे.



**६) सांधेदुखी :** १० ग्रॅम ओवा, ५ ग्रॅम बडीशेप व १० ग्रॅम तेजपान एकत्रित करून कुटून एक लिटर पाण्यात उकळवा. त्यानंतर थंड करून हा काढा घेतल्यास कंबरदुखी, गुडघेदुखी, सांधेदुखी संपूर्ण नष्ट होते.

**७) मधुमेह :** तेजपानाचे चूर्ण १-१ चुटकीभर सकाळ- दुपार- सायंकाळ पाण्यासोबत घेतल्यास डायबेटीस नियंत्रणात येतो.

**८) शरीरात कुठेही मोंच आल्यास :** पाय, हात, मुरगळल्यास, लचकल्यास, तेजपान व लवंग एकत्रितपणे कुटून याचा लेप तेथे लावल्यास वेदना व सूज दूर होते.

**९) अपचन, अजीर्ण :** तेजपानाचे चूर्ण १ ते ४ ग्रॅम घेतल्यास पोट फुगणे, करपट ढेकर, अपचन, मुरडा मारणे सर्व दूर होतात.

**१०) लहान मुलांचे सर्व प्रकारचे त्रास :** किरकिर करणे, उगाच रडरड करतात, हातपाय दुखतात अशा वेळी २ ते ३ ग्रॅम तेजपानाचे चूर्ण व आल्याचा रस व मध एकत्रित करून त्यांना अधूनमधून चाटण द्यावे.

**११) केसातील उवा मारणे :** तेजपान १०-१२ घेऊन चांगले उकळावे. पाण्यात घालून नंतर थंड करून मालीश करावे. या पाण्याने केस धुतल्यास उवा मरून बाहेर पडतात.

**१२) दमा, अस्थमा, खोकला :** तेजपान व पिंपळी २-२ ग्रॅम कुटून आलेपाकासोबत खायला द्यावे. तसेच ६० ग्रॅम मनुका, ६० ग्रॅम तेजपान, ५ ग्रॅम पिंपळी व ३० ग्रॅम बदामाची पावडर, ५ ग्रॅम वेलची असे चूर्ण बनवून यात गूळ टाकून गोळ्या बनवा व गरम दुधासोबत घ्या. सर्व आजार बरे होतात.

**१३) कावीळ :** रोज ५-६ तेजपान दिवसभरात खाल्यास कावीळ व यकृताचे आजार बरे होतात. पाने कोवळी व हिरवीच खावीत.

**१४) स्त्रीयांचे आजार :** गर्भाशय शुद्धी, मासिक पाळी नियमित न येणे, अंगावरून पांढरे पाणी जाणे, याकरिता तेजपानाचे चूर्ण दोनदा पाण्यासोबत घ्यावे.

**१५) न्यूमोनिया :** तेजपान, नागकेशर, बडी वेलची, कापूर, शीतल चिनी व लवंग हे सर्व कुटून त्याचा काढा बनवून घ्यावा व दिवसभरातून दोनदा घ्यावा. न्यूमोनिया बरा होतो. वरील उपाय बघता अतिशय गुणकारी मसाल्यात याची वर्णी लागते.

**निरोगी आयुष्याची सुरूवात आजच करा**

आपण आणि आपले कुटुंब निरोगी व आनंदी राहावे, हीच प्रत्येकाची इच्छा असते. मधुमेह, बीपी, ताणतणाव आणि व्यसन यांसारख्या समस्या योग्य माहिती व जीवनशैली बदलाने टाळता येऊ शकतात.

# ‘टाइगर ऑफ ड्रास’ : कैप्टन अनुज नैयर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

द्रास की बर्फीली चोटियों पर ‘टाइगर ऑफ ड्रास’ के नाम से मशहूर कैप्टन अनुज नैयर कारगिल युद्ध के उन अमर वीरों में से एक हैं, जिनकी बहादुरी आज भी हर भारतीय के सीने में जोश भर देती है। महज २३ साल की उम्र में उन्होंने दुश्मन के सामने ऐसी जांबाजी दिखाई कि मरणोपरांत महावीर चक्र से सम्मानित किया गया।

बचपन से ही अनुज में सेना में जाने का जुनून था, शायद दादाजी लेफ्टिनेंट बख्शी राम नैयर की कहानियों से प्रेरित होकर। १९९७ में वे १७ जाट रेजिमेंट में कमीशन हुए और १९९९ में जब कारगिल में घुसपैठ की खबर आई, तो उनकी यूनिट मुश्कोह वैली में तैनात हुई।

उनकी सबसे बड़ी जंग पॉइंट ४८७५ पर हुई, जिसे पिंपल २ कॉम्प्लेक्स भी कहते हैं। यह चोटी करीब १६००० फीट की ऊंचाई पर थी, जहां दुश्मन ने मजबूत बंकर बना रखे थे। बिना किसी हवाई सहायता के ६ जुलाई १९९९ को चार्ली कंपनी ने हमला बोला। कंपनी कमांडर घायल हो गए, तो अनुज नैयर ने कमान संभाली।
बर्फीली ढलानों पर तेज गोलीबारी और ठंड के बीच अनुज और उनके साथियों ने दुश्मन के बंकरों पर धावा बोला। अकेले अनुज ने ९ पाकिस्तानी सैनिकों को मार गिराया और ३ मीडियम मशीनगन बंकरों को नेस्तनाबूद कर दिया। चौथे बंकर पर हमला करते वक्त दुश्मन का आरपीजी रॉकेट प्रोपेल्ड ग्रेनेड सीधे उन पर लगा। घायल होने के बावजूद उन्होंने हार नहीं मानी और अपनी आखिरी सांस तक लड़ते रहे।
७ जुलाई १९९९ को उन्होंने वीरगति प्राप्त की, लेकिन उनकी बहादुरी से पॉइंट ४८७५ पर तिरंगा लहराया गया।



अनुज की जिंदगी में एक दर्दनाक मोड़ भी था। वे शादी के बस दो महीने दूर थे। उनकी मंगेतर सिमरन/टिम्मी जिनके साथ सितंबर में शादी तय थी। मिशन से पहले उन्होंने अपनी एंगेजमेंट रिंग कमांडिंग ऑफिसर को सौंप दी थी, ये कहकर कि अगर मैं लौट आया तो खुद दूंगा, वरना उन्हें दे देना।

**फोन पर मंगेतर ने पूछा था- रिंग साथ है?**

अनुज ने मुस्कुराकर झूठ बोला- हां है, ताकि वो चिंता न करें। लेकिन किस्मत ने कुछ और ही लिखा था।
उनकी आखिरी चिट्ठी पिता को लिखी गई थी, जो आज भी रोंगटे खड़े कर देती है। इसमें उन्होंने लिखा था।
“अभी तक कोई ऐसा माई का लाल नहीं मिला जो मुझसे जीत पाए। वो दिन कभी नहीं आएगा जब मुझे हार माननी पड़े। डर शब्द मेरी डिक्शनरी में है ही नहीं, जो आपने मुझे सिखाई है। मैं अब हथियार चलाने में माहिर हो गया हूं, बिना हथियार के भी मुकाबला कर सकता हूं। आप चिंता मत कीजिए। हम अगस्त में आपके २५ वें एनिवर्सरी मनाएंगे।”
आज भी अनुज की याद में सम्मान होते रहते हैं। इंडियन रेलवे ने एक लोकोमोटिव डब्ल्यूएजी ९ एचसी उनके नाम से डेडिकेट की। कारगिल में एक ब्रिज कैप्टन अनुज नैयर महावीर चक्र सेतु नामित हुआ। शहीद कैप्टन अनुज नैयर अमर रहे।

# जेवणाआधी की जेवणासोबत?
## सॅलड खाण्याची योग्य पद्धत कोणती?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सॅलड वजन कमी करण्यासोबत शरीराला आवश्यक पोषक तत्त्वे मिळवून देण्यासाठीही फायदेशीर ठरते. कच्च्या भाज्या आणि फळांमधून जीवनसत्त्वे, खनिजे आणि अँटी-ऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात शरीराला मिळतात. सॅलडमध्ये फायबरचे (तंतुमय पदार्थ) प्रमाण मोठ्या प्रमाणात असते. त्यामुळे बद्धकोष्ठतेचा त्रास कमी होऊन पचनक्रिया सुरळीत राहण्यास मदत होते. सॅलड खाल्ल्याने पोट भरल्या सारखे वाटत असल्यामुळे अतिरिक्त कॅलरी खाणे टाळली जाते. परिणामी वजन कमी करण्यासाठी मदत होते. काकडी, टोमॅटो यासारख्या भाज्यामध्ये पाण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात असल्याने शरीर हायड्रेटेड राहण्यास मदत होते.
सॅलडमध्ये विविध भाज्यांचा समावेश असल्याने अँटी ऑक्सिडंट्स शरीरला मिळते. त्यामुळे त्वचा सतेज होते, केस गळती कमी होण्यास मदत होते.
सॅलडमध्ये विविध भाज्यांचा समावेश असल्याने अँटी-ऑक्सिडंट्स शरीरला मिळते,



त्यामुळे त्वचा सतेज होते, केस गळती कमी होण्यास मदत होते. सॅलडवर जास्त मीठ टाकणे टाळावे. त्याऐवजी लिंबू पिळावा, भाज्या कोमट पाण्यात मीठ टाकून स्वच्छ धुवून घ्याव्यात. सॅलड जेवणाआधी किंवा जेवणासोबत खावे. रात्री उशिरा सॅलड खाणे काही लोकांना पचनास जड जाऊ शकते. सॅलडमध्ये मेयॉनीज किंवा जास्त क्रीम वापरणे टाळावे. कारण त्यामुळे कॅलरीज वाढता.

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**हे करून पाहा...**

* पाव चमचा कच्चे तीळ चावून खावेत. महिनाभर हा उपाय केल्याने पाय दुखणे थांबते.
* गरम पाण्याच्या पिशवीने कंबर शेकावी. रोज १ चमचा सुंठवडा आठ दिवस खाल्ल्याने कंबरदुखी बंद होते
* कोठेही उसण भरली अथवा लचक आली तर मोहरीचे तेल मालिश करून लावावे व मग तो भाग शेकावा.
* हेअर लाईन क्रॅंक कच्च्या डिंकाचे लाडू खाण्याने ही चीर लवकर भरून येण्यास मदत होते.
* मायफळाची पावडर हिरडयांना लावून अर्ध्या तासाने चुळा भराव्यात हिरड्याची शिवशिव ,सळसळ,दुखणे थांबते.
* हिरड्यांना सूज असेल तरी त्रिफळा चूर्ण लावल्याने आराम मिळतो.
* ओवा व साखर गरम पाण्याबरोबर घेण्याने पोटदुखी कमी होते.
* अगदी तान्हे बाळ असेल तर आईने ओवा चावून बाळाच्या बेंबीवर तोंडानेच वाफारा सोडला तरी पोटदुखी कमी होते.
* गॅसेसमुळे बाळाचे पोट दुखत असेल तर हिंग पाण्यात कालवून त्याचा लेप बेंबीभोवती दिल्याने आराम पडतो.
* जुलाब होत असतील तर खसखस तुपात परतावी व दुधात शिजवावी. २ चमचे खसखस घ्यावी. हे मिश्रण प्यायल्याने जुलाब थांबतात.
* लहान बाळाला जुलाब होत असतील तर जायफळ उगाळून साखरेबरोबर चाटवावे.
* उलट्या होत असतील तर धने रात्री पाण्यात भिजत घालावेत. ते पाणी धन्यासकट उकळावे. यात साखर व मीठ घालून थोडे थोडे पाजत राहावे.
* अननसाच्या फोडी त्यावर साखर घालून खाव्यात त्यानेही पचन सुधारते.
* रोज रात्री झोपताना हळद व आवळकाठी यांचे मिश्रण घेतल्यानेही शौचास होणारा खडा मोडतो.
* लिंबू , मीठ घालून केलेले शरबत थोडेथोडे थोडया वेळाने पिण्याने अपचनाचा त्रासापासून सुटका होते.

# नुसते ताक पिण्यापेक्षा त्यात टाका ‘हा’ मसाला; उष्णता होईल क्षणात गायब

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

उन्हाळ्याचा तडाखा वाढलाय? वाढत्या उष्णतेमुळे शरीराची लाहीलाही होत असेल, तर नुसते पाणी पिण्यापेक्षा ताक पिणे कधीही उत्तम.

**ताक आहे अमृतासारखे**

ताक केवळ तहान भागवत नाही, तर शरीराला आतून थंडावा देण्यासही मदत करते.

**नुसते ताक पिण्यापेक्षा...**

जर तुम्ही ताकात एक विशेष मसाला मिक्स केला, तर त्याचे फायदे आणि चव दोन्ही दुप्पट होतात.



**हा आहे तो ‘खास मसाला’**

ताकात जिरे पूड, काळं मीठ आणि थोडा चाट मसाला एकत्र करून पहा, यामुळे पचनशक्ती सुधारते.

**उष्णता होईल क्षणात गायब**

जिऱ्यामध्ये नैसर्गिक थंडावा असतो, जो शरीरातील उष्णता शोषून घेण्यास मदत करतो.

**पोटाच्या समस्यांवर गुणकारी**

जर तुम्हाला पित्त किंवा गॅसचा त्रास असेल, तर हा मसाला घातलेले ताक पिणे रामबाण उपाय ठरेल.

**पुदिना आणि कोथिंबीर**

अधिक फ्रेश वाटण्यासाठी ताकात थोडा पुदिना आणि बारीक चिरलेली कोथिंबीर नक्की टाका.

# बेटे से दूर रहकर की तैयारी, दूसरे प्रयास में हासिल की युपीएससी रैंक २

**काम को लेकर चर्चा में रहने वाली जिला कलेक्टर अनु कुमारी**


**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**सक्सेस स्टोरी**

केरल के तिरुवनंतपुरम की जिला कलेक्टर अनु कुमारी हमेशा अपने काम को लेकर चर्चा में रहती हैं। उनका आईएएस बनने का सफर भी काफी प्रेरणादायक है। उन्होंने अपने कुछ ही महीने के बच्चे को खुद से दूर रहकर युपीएससी की तैयारी शुरू की थी। संघ लोक सेवा आयोग की सिविल सेवा परीक्षा देश और दुनिया की कठिन परीक्षा में से एक है। जितनी टफ परीक्षा है, उतनी ही टफ है इसकी तैयारी। तैयारी और भी ज्यादा मुश्किल हो जाती है, जब एक मां अपने कुछ ही महीने के बच्चे से दूर रहकर तैयारी करती हो। हम बात कर रहे हैं अनु कुमारी की जिन्होंने वर्ष २०१७ में यूपीएससी रैंक २ लाकर सभी को चौंक दिया। हालांकि, पहली बार में उन्हें सफलता नहीं मिली थी।

**दिल्ली यूनिवर्सिटी फिर आयएमटी नागपुर से की पढ़ाई**

अनु कुमार हरियाणा के सोनीपत की रहने वाली हैं। स्कूल पढ़ाई के बाद उन्होंने दिल्ली यूनिवर्सिटी से की है। फिजिक्स से बीएस्सी किया है। इसके बाद उन्होंने



आयएमटी नागपुर से एमबीए किया। एमबीए पूरा करने के बाद अनु कुमारी को बड़ी आयटी कंपनी में नौकरी मिल गई। लेकिन वे अपनी नौकरी से खुश नहीं थीं। यही कारण है कि उन्होंने यूपीएससी की तैयारी करने का सोचा। उन्होंने अपने इंटरव्यू में भी बताया था कि वे नौकरी तो कर रही थीं लेकिन अंदर से संतुष्ट नहीं थीं।

**दो साल बेटे से रहीं दूर**

साल २०१२ में उनकी शादी हुई और वे गुरुग्राम में रहने लगीं। कुछ समय बाद वे मां बनीं, लेकिन सिविल सेवा में जाने का सपना अभी भी उनके मन में था. ऐसे में उन्होंने दिल पर पत्थर रखकर अपने बेटे को अपने से दूर मां के पास भेज दिया और फिर यूपीएससी की तैयारी शुरू की। एक मां के रूप में ये उनकी लाइफ का सबसे कठिन फैसला था।

**दूसरे प्रयास में मिली सफलता**

पहले प्रयास में वे यूपीएससी परीक्षा केवल एक अंक से चूक गईं। हालांकि उन्होंने हार नहीं मानी। कड़ी मेहनत और दृढ़ संकल्प के बल पर दूसरे प्रयास में साल २०१७ में उन्होंने ऑल इंडिया रैंक २ हासिल कर इतिहास रच दिया।

**वर्तमान में कहां कार्यरत हैं?**

आज अनु कुमारी केरल के तिरुवनंतपुरम में जिला कलेक्टर के पद पर कार्यरत हैं। अनु कुमारी की उन लाखों महिलाओं के लिए प्रेरणा बन चुकी है, जो शादी के बाद अपने सपने को भूल जाती हैं।

**काम के लिए जीत चुकी हैं अवार्ड**

अनु कुमारी उन चुनिंदा आईएएस में से हैं, जो ग्राउंड पर काफी एक्टिव रहती हैं। उन्होंने केरल में अपनी पोस्टिंग के दौरान यहां की ट्राइबल कम्युनिटी, कल्चर और ट्रेडिशन को सपोर्ट किया है. हाल ही में अनु कुमारी को बेस्ट डिस्ट्रिक्ट इलेक्शन ऑफिसर अॅवार्ड से नवाजा गया है।

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षाचा समृद्ध अनुभव असलेले शोरूम
सीमा हॅण्डलूम हाॅउस पारोळा रोड, धुळे




# भगवान श्रीकृष्णांचे वडील वासुदेव मागील जन्मात कोण होते?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपण अनेकदा भगवान श्रीकृष्ण यांच्या पराक्रमांची स्तुती करतो. पण तुम्ही कधी विचार केला आहे का की वासुदेवांना भगवान पिता होण्याचे मोठे भाग्य का मिळाले? यामागे एक आकर्षक पौराणिक कथा आणि एक शाप आहे.

### ऋषी कश्यप यांचे बलिदान आणि लोभ

एकदा महर्षी कश्यप एक भव्य यज्ञ करत होते. ते पूर्ण करण्यासाठी त्यांनी वरुणदेवाकडे स्वर्गातून एक दिव्य गाय मागितली. वरुणदेवाच्या कृपेने यज्ञ कोणत्याही अडथळ्याशिवाय पूर्ण झाला. परंतु कश्यप गायीसाठी लोभी झाला आणि ती परत करण्यास स्पष्टपणे नकार दिला.


### ब्रह्मदेवाचा हस्तक्षेप आणि शाप

वरुणदेवाच्या वारंवार समजावूनही जेव्हा ऋषी अविश्वासू राहिले, तेव्हा प्रकरण परम भगवान ब्रह्मदेवापर्यंत पोहोचले. ब्रह्मदेवाने स्पष्ट केले, 'लोभ तुमच्या सद्गुणांचा नाश करत आहे,' परंतु कश्यप अतार्किकपणे वाद घालू लागला. यामुळे क्रोधीत होऊन ब्रह्मदेवाने शाप दिला, की 'ऋषी असूनही तुझी बुद्धी भ्रष्ट झाली आहे. तुझे जीवन गायीमध्ये अडकले आहे म्हणून मी तुला शाप देतो की तू पृथ्वीवर तुझ्या एका भागातून गोपाळ म्हणून जन्म घेशील.'

### शाप वरदान ठरला

शाप ऐकून कश्यपला त्याची गंभीर चूक कळली. खोलवर पश्चात्ताप होऊन त्याने ब्रह्मा आणि वरुण दोघांकडूनही क्षमा मागितली. त्याचा पश्चात्ताप पाहून ब्रह्मदेवाचा क्रोध शांत झाला आणि त्याने शाप सुधारला आणि त्याला एक अद्भुत वरदान दिले. 'तू पृथ्वीवर तुझ्या एका भागातून यदू कुळात जन्म घेशील. तेथे तू गायींची चांगली सेवा करशील आणि भगवान हरि (भगवान विष्णू) स्वतः तुला आशीर्वाद देण्यासाठी तुझा पुत्र म्हणून जन्म घेतील.' हेच महर्षी कश्यप द्वापारयुगात यदू कुळात 'वासुदेव' म्हणून अवतारले आणि परमदेव स्वतः त्यांचा मुलगा 'श्रीकृष्ण' म्हणून पृथ्वीवर आले. लोभ माणसाच्या अधोगतीला नेतो. पण खऱ्या मनाने केलेला पश्चात्ताप देवालाही भावतो.

**। जय श्रीराधे-श्रीकृष्ण।**



# पादुकांना नमस्कार कसा करावा?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पादुका हे शिव आणि शक्ती यांचे प्रतीक असतात अन् नमस्कार करताना त्रास होऊ नये म्हणून पादुकांच्या खुंट्यांवर डोके न ठेवता पादुकांच्या पुढच्या भागावर डोके ठेवून नमस्कार करणे.

'डावी पादुका ही शिवस्वरुप आणि उजवी पादुका ही शक्तिस्वरुप असते. डावी पादुका म्हणजे ईश्वराची अप्रकट तारक शक्ति आणि उजवी पादुका म्हणजे ईश्वराची अप्रकट मारक शक्ति होय. पादुकांच्या अंगठयातून (पादुकांच्या खूंट्या) आवश्यकते प्रमाणे ईश्वराची तारक आणि मारक शक्ति बाहेर पडत असते. ज्या वेळी आपण पादुकांच्या अंगठयावर डोके टेकवून नमस्कार करतो, त्या वेळी काही जणांना त्यातील प्रकट शक्ति न पेलवल्याने त्रास होऊ शकतो यासाठी पादुकांना नमस्कार करताना शक्यतो डोके पादुकांच्या अंगठयावर न टेकवता पादुकांच्या पुढच्या भागावर (जेथे संतांच्या पायांची बोटे येतात) तेथे टेकवावे. श्री दत्तात्रेयांच्या उपासनेत अनेक ठिकाणी पादुका पूजनास महत्त्व आहे.

श्री दत्तात्रेय हे गुरू स्वरूपात सर्वत्र आढळत असल्यामुळे त्यांच्या चरणपूजेचा महिमा वाढलेला आहे. दत्त संप्रदायात गुरूपेक्षा गुरु चरणांनाच महत्वाचे स्थान आहे. म्हणून दत्त पंथीयात श्रीगुरु व त्यांच्या चरण पादुका यांना फार महत्व आहे. श्रीगुरूंच्या वा इष्ट देवतेच्या पादुका पूजण्याचा प्रकार फार पूर्वीपासूनचा आहे. श्रीराम वनवासात असताना भरताने त्यांच्या पादुका सिंहासनावर ठेवून आदर भाव दर्शविला होता.

अतिशय प्रिय व्यक्तीविषयी, थोर व्यक्तीविषयी आदर दाखविणे म्हणजे त्यांच्या पायावर डोके ठेवणे. यातील आणखी एक रहस्य असे की, श्रेष्ठ सत्पुरुषांची सर्व दैवी शक्ती त्यांच्या चरणात एकवटलेली असते. त्यांच्या चरण-स्पर्शाने कंपनाद्वारा ती शक्ती भक्तांत संचारत असल्याचा अनेकांना अनुभव आलेला आहे. म्हणूनच अनेक दत्तस्थानांत दत्त मूर्तीपेक्षा दत्तपादुकांना महत्वाचे स्थान मिळाले आहे.

गिरनार शिखरावर दत्तात्रेयांच्या पादुकाच आहेत. गाणगापूर येथे श्री नृसिंह सरस्वती यांनी निर्गुण पादुकाच मागे ठेवल्याची कथा आहे. नृसिंहवाडीलाही दत्त पादुकांचीच पूजा केली जाते. देवगिरीवर जनार्दनस्वामींच्या समाधी स्थानी पादुकाच आहेत.

विष्णूचा जसा शाळीग्राम तसे दत्तोपासनेत दत्तांच्या पादुकांना महत्वाचे स्थान आहे. या दत्त पादुकांची पूजा सगुण व निर्गुण स्वरूपात केली जाते. म्हणूनच 'मी ठेवितो मस्तक ज्या ठिकाणी । तेथे तुझे सद्गुरू पाय दोन्ही ॥' असे नम्रपणे नतमस्तक होऊन म्हटले जाते.

# घरातील वातावरणासह माणसाच्या मनावर सजावटीच्या वस्तूंचा प्रभाव पडतो का?

## जाणून घ्या उंटाच्या मूर्तीचे महत्त्व

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपल्या घराची सजावट करताना आपण अनेक नवनवीन वस्तूंचा वापर करत असतो. यातील काही वस्तू केवळ घराचे सौंदर्यच वाढवत नाहीत, तर त्यामागे एक सखोल अर्थही दडलेला असतो. घरातील वातावरण आणि माणसांचे मन यावर या सजावटीच्या वस्तूंचा मोठा प्रभाव पडत असतो. तुम्ही अनेक घरांमध्ये उंटाची आकर्षक मूर्ती किंवा पुतळा ठेवलेला पाहिला असेल. परंतु तुम्हाला हे माहिती आहे का की, फेंगशुई आणि वास्तुशास्त्रानुसार या मूर्तीचे एक विशेष महत्त्व आहे? जर ही उंटाची मूर्ती घरात अगदी योग्य दिशेला आणि अचूक नियमांनुसार स्थापित केली, तर त्याचा तुमच्या नोकरी, व्यवसाय आणि एकूणच नशिबावर अत्यंत सकारात्मक परिणाम दिसून येतो. आजच्या काळात लोक फक्त घर सुंदर दिसण्यावरच भर देत नाहीत, तर घरातील 'सकारात्मक उर्जेचे संतुलन' राखण्यालाही अधिक प्राधान्य देत आहेत. जर तुम्हालाही तुमच्या आयुष्यात आणि घरात सकारात्मक ऊर्जा व चांगले बदल हवे असतील, तर उंटाच्या मूर्तीबाबतचे वास्तुशास्त्रातील हे नियम नक्की समजून घ्या.

### उंटाच्या मूर्तीचे महत्त्व

वास्तुशास्त्रात उंटाला अत्यंत स्थिर, धैर्यवान आणि सतत प्रगती पथावर चालणाऱ्या प्राण्याचे प्रतीक मानण्यात आले आहे. ज्याप्रमाणे वाळवंटात कितीही कठीण परिस्थिती असली तरी उंट न थांबता आपला प्रवास नेटाने सुरूच ठेवतो, अगदी त्याचप्रमाणे ही उंटाची मूर्ती माणसाला जीवनात येणाऱ्या संकटांवर आणि अडथळ्यांवर यशस्वीपणे मात करण्याची कायम प्रेरणा देत असते.



### उंटाची मूर्ती कोणत्या दिशेला ठेवावी?

वास्तुशास्त्र आणि फेंगशुईच्या तज्ज्ञांच्या मते घरात उंटाची मूर्ती ठेवण्यासाठी वायव्य दिशा ही सर्वांत उत्तम आणि शुभ मानली जाते. ही दिशा प्रामुख्याने एकमेकांचे सहकार्य आणि सामाजिक संबंध दृढ करण्याशी जोडली गेली आहे. जर काही कारणास्तव तुम्हाला वायव्य दिशेला मूर्ती ठेवणे शक्य नसेल, तर तुम्ही घराच्या पूर्व किंवा उत्तर दिशेलाही ही मूर्ती स्थापित करू शकता. योग्य दिशेला ठेवलेली ही मूर्ती घरातील वातावरणात शांतता, सकारात्मकता आणि कमालीची स्थिरता निर्माण करण्यास मोलाची भूमिका बजावते.

### घरात मूर्ती ठेवण्यासाठी योग्य जागा कोणती?

केवळ योग्य दिशाच नाही, तर घरातील योग्य जागा निवडणे देखील तितकेच गरजेचे आहे. उंटाचा पुतळा नेहमी दिवाणखान्यात ठेवावा. कारण याच ठिकाणी कुटुंबातील सर्व सदस्य आणि घरी येणारे पाहुणे आपला सर्वाधिक वेळ व्यतीत करत असतात. दिवाणखान्यात अशा प्रकारच्या वास्तुशास्त्राला अनुसरून असलेल्या वस्तू ठेवल्याने घरातील वातावरण पूर्वीपेक्षा अधिक मोकळे आणि प्रसन्न राहते, असे अनेकांचे मत आहे. उंटाची मूर्ती ही स्थिर ऊर्जेचे प्रतिनिधित्व करते. वास्तुशास्त्र असे सांगते, की उंटाची मूर्ती नेहमी जोडीने (दोन उंट) ठेवली पाहिजे. यातून व्यवसाय आणि नोकरीच्या ठिकाणी सहकार्याची भावना आणि समतोल निर्माण होण्यास मदत होते. मात्र, एक गोष्ट कायम लक्षात ठेवावी की, उंटाची मूर्ती कधीही बेडरूमजवळ, बाथरूमच्या जवळपास, जिन्याखाली किंवा घराच्या मुख्य दरवाजाच्या एकदम समोर ठेवू नये. या जागांवर मूर्ती ठेवणे अशुभ मानले जाते. तसेच, मूर्ती ठेवताना उंटाचा चेहरा नेहमी घराच्या आतील बाजूस असायला हवा, घराच्या बाहेरील बाजूस नाही.

### मूर्तीचा आकार आणि धातू कसा असावा?

उंटाची मूर्ती निवडताना तांब्याची किंवा पितळेची मूर्ती सर्वात जास्त शुभ मानली जाते. तरीही, तुम्ही तुमच्या आवडीनुसार दगडी किंवा लाकडी मूर्तीचाही वापर करू शकता. मूर्तीचा आकार हा नेहमी मध्यम असावा; ती खूप जास्त मोठी किंवा अगदीच लहान नसावी, जेणेकरून घरातील ऊर्जेचे संतुलन बिघडणार नाही. विशेष काळजी घ्या की, घरात कधीही तुटलेली किंवा खंडित झालेली मूर्ती ठेवू नका, कारण त्यातून घरात नकारात्मक ऊर्जा पसरू शकते. यासोबतच मूर्तीची नियमित स्वच्छता राखणेही अत्यंत आवश्यक आहे.

### उंटाची मूर्ती घरात ठेवल्याने होणारे फायदे

वास्तुशास्त्र आणि फेंगशुईच्या नियमांचे काटेकोर पालन करून उंटाची मूर्ती घरात स्थापित केल्यास घरात सुख, शांती आणि सौभाग्य मोठ्या प्रमाणावर वाढते. जे लोक नोकरीमध्ये वारंवार येणाऱ्या अडचणींमुळे त्रस्त आहेत, ज्यांच्या पदोन्नतीमध्ये विलंब होत आहे, किंवा ज्यांचा व्यवसाय मंदावला आहे, अशा लोकांसाठी उंटाची मूर्ती एक अत्यंत सकारात्मक आणि शुभ चिन्ह ठरते. वास्तुशास्त्रामध्ये असे छोटेसे बदल केल्याने आपला आत्मविश्वास दुणावतो आणि मनाला कमालीची शांती मिळते, असा अनेकांचा प्रत्यक्ष अनुभव आहे. उंटाचा पुतळा हा संथ परंतु खात्रीशीरपणे होणाऱ्या निरंतर प्रगतीचा एक उत्तम संदेश देतो.

वास्तुशास्त्र हे प्राचीन भारतीय स्थापत्यविज्ञान मानले जाते, ज्यामध्ये घर किंवा इमारतीची रचना पंचमहाभूते, दिशा आणि उर्जेचा योग्य प्रवाह यावर आधारित असते. या नियमांचे पालन केल्याने घरातील नकारात्मकता दूर होऊन सकारात्मक ऊर्जा वाढते. यामुळे कुटुंबातील सदस्यांमध्ये प्रेम आणि सलोखा टिकून राहतो. योग्य दिशेला घराचा मुख्य दरवाजा, स्वयंपाकघर, देवघर आणि शयनकक्ष असल्यास घरात समृद्धी, उत्तम आरोग्य आणि स्थैर्य येते. वास्तू नियमांनुसार घरात हवा आणि प्रकाश यांचा योग्य प्रवेश होत असल्याने आरोग्यावरही अनुकूल परिणाम होतो. त्यामुळे, वास्तुशास्त्राची ही तत्त्वे आणि उंटाच्या मूर्तीसारखे छोटे बदल दैनंदिन जीवनात मानसिक समाधान, सुव्यवस्था आणि यशस्वी वाटचालीसाठी खूप फायदेशीर ठरतात.

# नवरत्न म्हणजे काय? महत्त्व, व्यवस्था आणि फायदे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

'नवरत्न' हा संस्कृत शब्द आहे. जो 'नव' आणि 'रतन' या दोन शब्दांपासून बनलेला आहे. 'नव' म्हणजे नऊ, तर 'रतन' किंवा रत्न म्हणजे रत्ने. ज्योतिषशास्त्रानुसार नऊ रत्ने आहेत. जी प्राचीन आणि पारंपरिक ग्रंथांनुसार सर्वांत शक्तिशाली आहेत. या रत्नांची ऊर्जा सर्वोच्च आणि सर्वांत प्रभावशाली आहे.

प्रत्येक नऊ नवरात्र एका विशिष्ट ग्रहाशी, नवग्रहांपैकी एकाशी जोडलेले असते. नवग्रह म्हणजे नऊ ग्रह जे आपल्या जीवनाचे नियमन करतात. आपल्या जन्माच्या वेळी ग्रहाची स्थिती आपले भाग्य निश्चित करते आणि आपल्या जीवनावर परिणाम करते. प्रत्येक ग्रह आपल्या जीवनाच्या वेगवेगळ्या पैलूंवर परिणाम करत असल्याने जेव्हा एखादा विशिष्ट ग्रह नकारात्मक स्थितीत असतो किंवा प्रतिकूल स्थितीत जातो तेव्हा हे रत्न धारण करणे हा उपाय आहे. हे रत्न त्या महत्त्वपूर्ण ग्रहाचे प्रतिकूल परिणाम दूर करते आणि त्याचे आशीर्वाद आणते.

### नवरत्न आणि त्यांचे महत्त्व


नवरत्नांमध्ये माणिक, पन्ना, निळा नीलम, पिवळा नीलम, हेसोनाइट, मोती, लाल कोरल, हिरा आणि कॅट्स आय यांचा समावेश आहे. हे नऊ रत्न सांस्कृतिकदृष्ट्या सर्वांत मौल्यवान आणि मौल्यवान आहेत. त्यांचे मूल्य ज्योतिषशास्त्रातील त्यांच्या महत्त्वामुळे आहे परंतु त्यांच्या दुर्मिळता आणि सौंदर्यामुळे देखील आहे. असे मानले जाते, की हे दगड धारण करणाऱ्या व्यक्तीला सकारात्मक ऊर्जा देतात. ज्यामुळे शांतता आणि आध्यात्मिक ज्ञान मिळते. तसेच ते व्यक्तीला शारीरिकदृष्ट्या बरे करते आणि आर्थिकदृष्ट्या स्थिर होण्यास मदत करते.

### नवरत्नांचे फायदे

प्रत्येक रत्नाचे स्वतःचे विशिष्ट आध्यात्मिक आणि उपचारात्मक गुणधर्म असतात.

### रुबी-माणिक

माणिक हा एक गडद लाल रत्न आहे. जो त्याच्या चमक आणि पारदर्शकतेसाठी ओळखला जातो. या रत्नावर सूर्याचे राज्य आहे. जो आपल्या जीवनशक्तीचे प्रतिनिधित्व करणारा ऊर्जास्रोत आहे. जेव्हा तुम्ही मूळ माणिक रत्न धारण करता तेव्हा ते तुमच्यावर सूर्याचे आशीर्वाद आणते. म्हणजेच ते तुमची उग्रता, धाडस आणि नेतृत्व कौशल्ये वाढवेल. त्याची ऊर्जा तुमचा



आत्मविश्वास वाढवेल आणि तुम्हाला शक्तीच्या स्थानावर घेऊन जाईल. ते तुम्हाला प्रेम आणि उत्कटता देखील देईल आणि तुमच्या संभाव्य जोडीदाराला आकर्षित करेल.

### पन्ना-पन्ना

पन्ना हा दगड हिरव्या रंगाच्या गडद रंगात आढळतो आणि त्याच्या सौंदर्यासाठी ओळखला जातो. हा दगड बुध ग्रहाशी - वाणी कारकाशी संबंधित आहे. हे रत्न धारण केल्याने व्यक्तीचे संवाद कौशल्य वाढते, सर्जनशीलता वाढते आणि यश मिळते. ते घसा किंवा बोलण्याशी संबंधित कोणत्याही समस्या देखील बरे करते. हा समृद्धी आणि वाढीचा दगड आहे.

### निळा नीलम-नीलम

निळा नीलम किंवा नीलम रत्न हा एक आकर्षक आणि गूढ गडद निळा दगड आहे जो सर्वात जलद गतीने कार्य करणाऱ्या रत्नांपैकी एक आहे. हा एक लोकप्रिय दगड आहे जो एखाद्या व्यक्तीला भाग्य, यश आणि संपत्ती आणतो. हे रत्न तुमचे मन उघडेल, तुमची कल्पनाशक्ती वाढवेल, मानसिक स्पष्टता वाढवेल आणि निर्णय घेण्याच्या कौशल्यांना प्रोत्साहन देईल. हे व्यक्तीला नकारात्मक उर्जेपासून देखील वाचवते आणि नातेसंबंध मजबूत करते.

### पिवळा नीलम-पुखराज

पिवळा नीलमणी हा बुद्धी आणि भाग्याचा दगड आहे. हे उबदार पिवळ्या रंगाचे रत्न गुरु ग्रहाचे स्वामी आहे, ज्याला गुरुग्रह म्हणतात. हा ग्रह तुमच्या शिक्षण आणि बुद्धीवर राज्य करतो. म्हणून, हे रत्न धारण केल्याने तुम्हाला तुमच्या अभ्यासात मदत होईल. ते तुम्हाला चांगले लक्ष केंद्रित करण्यास, तुमची बुद्धिमत्ता वाढविण्यास आणि तुमची स्मरणशक्ती वाढविण्यास मदत करेल. खरंच, हे रत्न जोडप्यांना समजूतदारपणा आणि सुसंवाद आणते, वैवाहिक आनंद देते.

### हेसोनाइट गोमेद

हेसोनाइट, गोमेद किंवा गोमेधिकम दगड , हा राहू ग्रहाच्या अधिपत्याखालील एक मधुर रंगाचा दगड आहे. हे रत्न एखाद्याच्या मार्गातील अडथळे दूर करते, भीतींवर मात करण्यासाठी शक्ती देते, कल्पनाशक्ती वाढवते आणि इच्छित ध्येये साध्य करण्यास मदत करते. ते रोगप्रतिकारक शक्ती वाढवते, ॲलर्जी बरे करते, शरीराला विषमुक्त करते आणि पचन सुधारते.

### हिरा-हिरा

प्रणय, सौंदर्य आणि स्त्री शक्तींचा ग्रह शुक्र, हिऱ्याच्या दगडावर राज्य करतो. हे रत्न नेहमीच वचनबद्धता आणि प्रेमाचे प्रतीक राहिले आहे. ते परिधान करणाऱ्यामध्ये शांती आणि उत्कटता वाढवते असे म्हटले जाते. हे तेजस्वी रत्न आत्मविश्वास वाढवते, आत्मसन्मान वाढवते आणि परिधान करणाऱ्याला शुभेच्छा देते. ते चिंता कमी करते आणि व्यक्तीचे एकूण कल्याण सुधारते.

### मोती-मोती

मोती किंवा मोती हे सुंदर रत्न आहेत जे पाण्याच्या खोलीत आढळतात आणि अद्वितीय देखील आहेत. ते चंद्र ग्रहाशी संबंधित आहे आणि म्हणूनच ते परिधान करणाऱ्याला शांती आणि शांती आणते असे ओळखले जाते. असे मानले जाते की ज्यांना रागाची समस्या आहे त्यांनी हे रत्न परिधान करावे कारण ते त्यांचा राग कमी करेल आणि व्यक्तीला संयम आणि शांती देईल. चंद्राची पवित्रता आणि दिव्यता देखील परिधान करणाऱ्याला मिळेल.

### कॅट्स-आय-लेहसुनिया

मांजरीच्या डोळ्यासारखाच दिसणारा हा दगड त्याच्या गूढ स्वरूपासाठी ओळखला जातो. त्याचे स्वरूप निसर्गाचे एक आश्चर्य आहे. मांजरीच्या डोळ्याच्या दगडाचा स्वामी ग्रह केतू आहे. केतू हा एक छाया ग्रह आहे जो तुमच्या अंतर्ज्ञान शक्ती वाढवेल आणि जीवनात योग्य दिशेने मार्गदर्शन करेल. तो तुम्हाला उच्च शक्तींशी जोडेल, आत्म-जागरूकता वाढवेल आणि तुम्हाला शुभेच्छा देईल.

### लाल कोरल-लाल मुंगा

लाल कोरल किंवा मुंग हा मंगळ ग्रहाचा दगड आहे. हे रत्न पती-पत्नीमधील गैरसमज किंवा लग्नात होणारा विलंब दूर करते आणि वैवाहिक लाभ आणते. हे रत्न धारण करणाऱ्या व्यक्तीमध्ये आत्मसन्मान वाढवते, नशीब आणि चांगले आरोग्य आणते आणि लैंगिक क्षमता वाढवते.

### नवरत्न दागिने आणि त्याची व्यवस्था

तुम्ही नऊ रत्ने एकत्र देखील घालू शकता. जीवन सुधारण्यासाठी हे सर्वांत शक्तिशाली आध्यात्मिक साधन असेल. परंतु योग्य पद्धतीने आणि योग्य व्यवस्थेत हे रत्ने घालणे आवश्यक आहे.

### नवरात्रांची व्यवस्था कशी असावी?

मध्यभागी रुबी ठेवली आहे. नंतर माणिकाभोवती एकामागून एक दगड ठेवा. हिरा, मोती, लाल कोरल, हेसोनाइट, निळा नीलम, मांजरीचा डोळा, पिवळा नीलम, पन्ना. नवरत्नांच्या दागिन्यांना स्वच्छ, शुद्ध आणि सक्रिय करण्यासाठी तज्ज्ञ ज्योतिषाचा सल्ला घ्या. ज्योतिषी मंत्रांचा जप करून आणि त्या उर्जेचा संबंध जोडून नवरत्नांना ऊर्जा देतील.

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)**